# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401101.
दूरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/927/2021-22 दि.26/07/2021

## शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी सेवाकरार पध्दतीने नियुक्त करणेबाबत..

## // जाहीर सूचना //

मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लेखापरीक्षण विभागासाठी शासनाकडील/महानगरपालिका सेवेतील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधून सेवाकरार पद्धतीने लेखापरीक्षण अधिकारी पदासाठी इच्छुक असलेल्या तसेच अर्हता पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवाराकडून खालील अटी व शर्तीवर दि. 10/08/2021 रोजी सायं. 4.00 वाजेपर्यंत आवक जावक विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, तळमजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे टपालाद्वारे किंवा स्वहस्ते अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जाचे लखोटे उघडण्यात येणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकिटावर "लेखापरीक्षण अधिकारी" पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

**उपलब्ध पदसंख्या :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | लेखापरीक्षण अधिकारी (सेवा करार पध्दतीने) | 08 | अ) लेखा अथवा लेखापरीक्षण सेवेतील वर्ग-01 अथवा वर्ग-02 पदावरील किमान 10 वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>ब) लेखापाल / सहा. लेखाधिकारी / सहा. लेखापरीक्षा अधिकारी अथवा यापेक्षा उच्च पदावरील कामाच्या अनुभवास प्राधान्य. |

**अटी व शर्ती :-**

1) उमेदवार शासनाकडील / महानगरपालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा.
2) उमेदवार लेखा अथवा लेखापरीक्षण विभागामधील पदावर किमान १० वर्षांचा अनुभव असावा.
3) सा.प्र.वि शासन निर्णय क्र. संकिर्ण-2715/प्र.क्र.100/13 दि. 17/12/2016 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
4) सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी यांची मासिक पारिश्रमिक व भत्ते दि. 17/12/2016 रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात येईल. एकदा निश्चित केलेल्या वेतनामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.
5) करार पद्धतीने नेमणुकीकरीता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय 65 वर्षापेक्षा अधिक नसावे.
6) सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त 01 वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नूतनीकरण करता येईल. परंतु एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
7) नियुक्तीच्या कालावधीमध्ये सोपविलेले लेखापरीक्षणासाठी काम पूर्ण करून लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमी पत्र/बंध पत्र घेण्यात येईल.
8) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात/ मनपामध्ये सेवा समावेशनाबाबत/ सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.
9) अतिरीक्त अर्हता- बी.कॉम/ एम.कॉम/ एम.बी.ए (फायनांस)/ शासनाकडील वित्त व लेखा संवर्गातील अधिकारी/ लेखापरीक्षण विभागातील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.
10) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा चालू प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशीप्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
11) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
12) आवश्यकतेप्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.
13) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)
जाक्र- मनपा/जनसंपर्क/209/2021-22
दि. 27/07/2021

सही/-
(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका